Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

Project in Environment Science

Session: 2021-2022

Name of the Project: Increasing population and Environment

Number of Students Enrolled: 09

Name of Co-ordinator : Dr. Lalita Punnaya

Brief Report of Activity

Academic Year- 2021-2022

Name of Project	Project on Increasing Population and Environment
Academic Year of the project	2021-2022
Subject/ Course under which the project is taken	Environment Science
Number of students Completing the course	09 Students
Brief Report	The project on Increasing Population and Environment was given to the students of Environment Science as one of the compulsory course of RTM Nagpur University in which the project work is mandatory for the students to complete during the Session 2020-2021. Accordingly 09 students completed the project and submitted their project reports. They were awarded grades on their project work.
Project outcomes	• The students learnt a lot through the project regarding the impact of Increasing Population on Environment . • They found out different aspects of the topic under study. • They completed the project under the guidance of the course co-ordinator. • They understood how the Environment is affected by the increasing population.
Number of Beneficiaries:	Students: 09
Criterion No: I	Metric No: 1.3.2

Signature of Course Co-ordinator	Signature and Stamp of IQAC Co-ordinator	Signature & Stamp of Principal
	Co-ordinator, IQAC Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur	Principal Yashoda Girls Arts & Commerce College, Sneh Nagar, Nagpur-15

List of students completing project

Purushottam Khaparde Health & Education Society's

Yashoda Girls'
Arts & Commerce College, Nagpur

Accredited B++ by NAAC

Estd. 1992

■ Recognized by Government of Maharashtra ■ Affiliated to RTM Nagpur University, Nagpur
SNEH NAGAR, WARDHA ROAD, NAGPUR - 440 015. (M.S.) INDIA
■ Tel. : 0712-2290637 ■ Fax No.: 0712- 2290368 ■ Website : www.yashodagirlscollege.edu.in ■ Email : ygc.ngp@rediffmail.com

YGC No./ Date

Project in Environment Science as per RTM Nagpur University Curriculum

Tile of the Pro Project on Increasing Population and Environement

Number of students completing the project : 09

Session 2021-2022

Sr. No.	Name of the students enrollment in project
1	ROSHNI DHANSING CHAUHAN
2	POONAM BHAGWAN TIRSAGARE
3	TAHSEENUNNISA MOHAMMAD HAFEEZ
4	NOORUS SABA SALEEM KHAN
5	ALISHA BEGAM JUNAID ALAM
6	ASIYA PARVEEN AFROZ KHAN
7	YASMIN PARVEEN A.S.QAYYUM
8	SHAIKH KHUSHBOO BEGAM
9	AAFREEN SABA Q KHAN

Signature of Project Co-ordinator

(Dr. Lalita Punnaya)

Co-ordinator, IQAC
Yashoda Girls' Arts &
Commerce College, Nagpur

Signature of the Principal

Principal
Yashoda Girls Arts & Commerce
College,Sneh Nagar,Nagpur-15

SEAL

Project Copy

Page No.
Date

Name : Roshni Dhansing Chauhan
Class : Bcom. 2nd year (IV) sem.
Subject : E.V.S Assignment.
Assignment name : Loksankhya Paryavaran.

College name : Yashodha girl's Arts and Commerce College.

2021-22

SEAL

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-14

Page No.
Date

★ लोकसंख्या पर्यावरण

देशाच्या भवितव्याचा दूरगामी विचार केला तर आपल्या देशापुढे सध्या प्रमुख आर्थिक समस्या आहेत. लोकसंख्या नियंत्रण, पर्यावरण रक्षणासह आर्थिक विकास आणि दारिद्र्य निवारण. या समस्यांवर मात करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करणे शक्य आहे. याचा ऊहापोह करणारा लेख.

लोकसंख्या वाढ ही समस्या आपल्याला नवीन नाही. अगदी १९४७ पासून आपल्या नेत्यांना या समस्येची कल्पना होतीच. वाढत्या लोकसंख्येचे (देशाच्या एकूण भवितव्यासाठी) नियंत्रण करणे कसे आवश्यक आहे, हे अनेक तज्ज्ञांनी अनेक वेळा सांगितले आहे. तथापि अगदी २०११ मध्येसुद्धा लोकसंख्या नियंत्रणाचा प्रश्न सुटला असे कोणीही आत्मविश्वासाने सांगत नाही. किंबहुना प्रत्येक शिरगणतीच्या अहवालामध्ये लोकसंख्या वाढीच्या शक्यतेची नव्याने जाणीव करून दिलेली असते. यासंबंधी थोडी आकडेवारी पाहणे उबोधक होईल.

१९७१ पासून २०११ या ४० वर्षामध्ये देशाची लोकसंख्या ५४ कोटी ८१ लाखवरून १२१ कोटी पर्यंत वाढली आहे. दुपटीपेक्षा जास्त! या ४० वर्षामध्ये लोकसंख्येच्या वाढीचा वेग जरी प्रत्येक शिरगणतीमध्ये कमी कमी होत असला तरी लोकसंख्येमध्ये होणारी एकूण वाढ मात्र दर शिरगणतीमध्ये वाढती आहे. उदा. १९७१-८१ मध्ये १३ कोटी ५२ लाख, १९८१-९१ मध्ये १६ कोटी ३० लाख, १९९१ ते २००१ मध्ये १८ कोटी २३ लाख, तर २००१-२०११ मध्ये (मात्र) १८ कोटी २५ लाख. अशी लोकसंख्येमधील एकूण वाढ राहिली आहे. दहा वर्षापेक्षा थोडी कमीच दिसते. हे स्वागतार्ह आहे. हेच कायम राहिल्यास २०१९ मध्ये लोकसंख्येमधील एकूण वाढ आणखी थोडीशी कमी झाले.

SEAL

Teacher's Signature

SEAL

अशी आशा करण्यास हरकत नाही. मात्र आपली लोकसंख्या खऱ्या अर्थाने स्थिर केव्हा होईल हे निश्चित सांगणे कठीण आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येमध्ये सर्वात मोठा वाटा उत्तर प्रदेशचा (२० कोटी), तर दुसरा क्रमांक महाराष्ट्राचा (११ कोटी) आहे. जागतिक लोकसंख्येमध्ये (साधारण ७०० कोटी) भारताचा वाटा १७.५ टक्के आहे. (चीन २१ टक्के) गेल्या कित्येक वर्षांमध्ये प्रभावी आणि कडक उपाययोजना करून चीनने लोकसंख्या नियंत्रणामध्ये उल्लेखनीय यश मिळविले आहे. आपल्याला अजून तरी असे जमलेले नाही. असो. या लोकसंख्येस काय हवे?

येथे आपल्याला आर्थिक विकासाचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. खागारी तोंडे पाडली की, सर्वप्रथम त्यांच्या अन्नपाण्याची सोय करावी लागते, तज्ज्ञांच्या अंदाजाप्रमाणे २०२५ पर्यंत देशाची लोकसंख्या साधारण १३० कोटी असे. होणे शक्य आहे. या प्रचंड लोकसंख्येचे पोट भरण्यासाठी देशामध्ये निदान ३२ कोटी अन्नधान्याचे उत्पादन होणे अत्यावश्यक आहे. सध्या अन्नधान्य उत्पादन साधारण २५ कोटी टन आहे. त्यामध्ये निदान २८ ते ३० टक्केवाढ करणे जरूरीचे आहे. अन्नधान्य पिकविण्यासाठी अधिकाधिक जमीन लागवडीखाली आणणे आता शक्य नाही. कारण तेवढी जमीनच नाही. तेव्हा पडीव अन्नधान्य उत्पादन करण्यासाठी शेतीचे उत्पादन यंत्र सुधारणे आवश्यक आहे. देशापुढे हे एक आव्हानच आहे. सर्वांना पुरेसे अन्न खाण्यास प्रत्यक्षामध्ये मिळाल्याशिवाय दारिद्र्यनिवारण शक्य नाही, हे विसरू नये.

पोट भरण्याइतकाच महत्वाचा दुसरा प्रश्न म्हणजे रोजगार निर्मितीचा! रोजगाराविना आर्थिक विकास जरी घडून

SEAL

Teacher's Signature

SEAL

आला तरी तो निर्दयी आहे. (Jobless Growth). आर्थिक विकासाचे पर्यवसान पुरेशा रोजगारनिर्मितीमध्ये झालेच पाहिजे. याबाबत आपली परिस्थिती काय आहे? देशामध्ये आज मितीस साधारण ४८ कोटी इतकी कामगार संख्या असून त्यामध्ये दरवर्षी २ कोटी २० लाख इतकी भर पडत आहे. या ४८ कोटींपैकी साधारण २६ कोटी शेती क्षेत्रामध्ये. तर २२ कोटी बिगरशेती क्षेत्रामध्ये आहे. तर २२ कोटी आहे.

रोजगार निर्मितीच्या क्षेत्रामध्ये अनेकविध आव्हाने आहेत. एक तर कामगारसंख्येमध्ये भर पडणाऱ्या २ कोटी २० लाख कामगारांसाठी तितकेच रोजगार दरवर्षी निर्माण करावे लागतील. शिवाय जलद आर्थिक विकास साधण्यासाठी शेती क्षेत्रावरील कामगारांची 'आऊटगर्दी' कमी करावी लागेल. त्यासाठी बिगरशेती क्षेत्र - विशेषत: लहान व मध्यम उद्योग यांचा विकास वेगाने घडून आणावा लागेल. तशातच शेतीवरील खुपसे रोजगार हे सरे रोजगार असतातच! तेथे कामगार अतिरिक्त - जादा (Surplus) असतात. या प्रकारास 'छुपी बेकारी' (Disguised Unemployment) म्हटले जाते. हा तथापि संख्येच्या प्रकार कमी करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. तथापि संख्येच्या रोजगारनिर्मितीचा वेग (दरवर्षी साधारण साठ लाख! गरज आहे २२० लाख रोजगारांची) पाहता हे 'दुष्कर कर्म' आहे यात शंका नाही! यासाठी सर्वंकष आर्थिक विकास घडून आणणे हेच मोठे आव्हान असेल.

सध्या आपल्याकडे 'समावेशक विकासासंबंधी' (Inclusive Growth) बरेच बोलले / लिहिले जाते. आर्थिक विकास समावेशक असलाच पाहिजे. तथापि 'दारिद्र्याचे पूर्ण निवारण' आणि पुरेशी रोजगारनिर्मिती घडून

Teacher's Signature

आल्याशिवाय कोणताही विकास समावेशक होणार नाही. येणाऱ्या, नवीन सरकारने जलद आर्थिक विकास, दारिद्र्य निवारण आणि रोजगार निर्मिती यांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागणार आहे.
हे झाले लोकसंख्या वाढ आणि विकासाच्या आवश्यकते-संबंधी ! परंतु गेल्या बऱ्याच वर्षांमध्ये विकासाच्या संदर्भामध्ये पर्यावरणरक्षणाचा प्रश्न प्रकर्षाने पुढे आला आहे. आर्थिक विकास जरी आवश्यक असला तरी तो साधत असताना पर्यावरणाचा बळी जाता कामा नये ही भूमिका अनेक मान्यवर विचारवंतांनी वेळोवेळी मांडली आहे, परंतु लोकसंख्या वाढली आणि अधिकाधिक विकास आवश्यक झाला की, पर्यावरणाचे रक्षण करणे कठीण होऊन बसते. आपण सविस्तर पाहू ! भारत जरी खेड्यांचा देश असला तरी वाढते शहरीकरण हे आपल्या लोकसंख्येचे एक महत्वाचे लक्षण आहे. खेड्याची शहरे आणि शहरांची महानगरे होत आहेत. लोकसंख्येचे केंद्रीकरण वाढते आहे. साहजिकच वाढती लोकसंख्या आणी आणते. शहरीकरण यामुळे शहरीकरण गरज भागविण्यासाठी जमीन, पाणी आणि जंगलसंपत्ती यावर अतोनात दडपण येत आहे. भविष्यामध्ये या साधनसंपत्तीचा तुटवडा वाढण्याची दाट शक्यता आहे. तथापि भविष्यकालीन विकासासाठी जमीन हा सर्वात महत्वाचा घटक आहे. वाढत्या लोकसंख्येसाठी पुरेशी घरबांधणी, उद्योगधंदे, रस्ते, महामार्ग, लोहमार्ग, विमानतळ यासाठी प्रचंड प्रमाणामध्ये जमीन या घटकांची आवश्यकता राहील. या गोष्टी आल्या की, त्या जमिनीवरील झाडे, वनस्पती, पशुपक्षी हे सर्व नष्ट होणार हे

Teacher's Signature

SEAL

ओघाने आलेच. उदा. २००० ते २०२० या काळामध्ये महाराष्ट्रामध्ये जवळजवळ २० लाख हेक्टर इतकी शेतजमीन बिगरशेती झाली. त्या जमीनीवर घरबांधणी किंवा इतर बांधकामे झाली असणार हे सांगते संरक्षण (Forest cover) केवळ साधारण २० टक्के एवढेच उरले आहे. पाणीपुरवठ्याचे तेच! पाण्याची उपलब्धता, १९४७ मध्ये दरवर्षी दरडोई ६००० घनमीटर होती, ती १९९९ मध्ये दरवर्षी १२५० घनमीटर इतकी घसरली. (लोकसंख्या १९५१ मध्ये ३६ कोटी, तर २००१ मध्ये १०० कोटी! मग दुसरे काय होणार?) याशिवाय पाणी आणि हवा यांच्या प्रदूषणाचा, दूषितीकरणाचा प्रश्न आहेत! विकासाची आवश्यकता आणि पर्यावरणाचा रक्षण या संदर्भामध्ये 'शाश्वत विकास' (Sustainable Development) ही संकल्पना पुढे आली आहे. या बाबतीत आर्थिक सर्वेक्षण (२०२-२३) म्हणते की, "१२ व्या पंचवार्षिक योजनेचा स्रोत (Focus) शाश्वत पर्यावरणावर आहे. (पर्यावरण टिकले पाहिजे) तथापि भारतामध्ये आर्थिक विकासाचे कारक (Drivers and enablers) (म्हणजे पायाभूत सोयी, वाहतूक, घरबांधणी इ.) गोष्टींची वाढही झाली (म्हणजे या सर्व गोष्टी आवश्यक आहेत, मग पर्यावरणाचे काय?) दुर्दैवाने यातून सरकारची नियोजित भूमिका समजत नाही. एकूणच पर्यावरण की विकास यातून विकास यातून करणे कठीण झाले आहे. 'घेतले तर चावते, सोडले तर पळते' यासंबंधी आपण काही उपाययोजना सुचविण्याचा प्रयत्न करू!

मग काय करायचे?

विकास आणि पर्यावरण दोन्ही एकाच वेळी साधण्यासाठी, आधुनिक विकास मार्गाच्या (म्हणजे मोठे उद्योग, शहरीकरण इ.) विरुद्ध असा पर्याय विकसित

Teacher's Signature

SEAL

विकासाचा मार्ग (म्ह. लहान उद्योग, कामगार प्राधान्य इ. इ.) सुचविला जातो, तसेच गांधीवादी विकासाचा मार्गही सुचविला जातो. तथापि पर्यायी विकेंद्रिय विकास मार्गामध्ये उत्पादकता कमी असल्यामुळे संपत्तीची निर्मिती कमी होते. सामान्य माणसाचे जीवनमान संपन्न न होता, खालच्या दर्जाचेच राहणार. शिवाय आंतरराष्ट्रीय आर्थिक स्पर्धेमध्ये आपण टिकू शकणार नाही हे लक्षात घ्यावे. गांधीवादी विकासाचा मार्ग स्वतंत्र भारताने (पं. नेहरूंनी) १९५६ पासूनच (दूसरी योजना) नाकारला आहे. पर्यायी विकास मार्ग, गांधीवाद हे उद्याच्या विकासाचे प्रमुख मार्ग होऊ शकणार नाहीत. दुय्यम मार्ग मदतनीस म्हणून ठीक आहेत. काही झाले तरी विकासाचा बळी देणे देशाला परवडणार नाही. आर्थिक सर्वेक्षण (२०२०-२१) म्हणते, विकासाच्या हरित मार्गाचे पर्यवसान मंदगती विकासामध्ये होऊ नये. 'रिओ' जाहीरनामा म्हणतो की, 'शाश्वत विकासाचा केंद्रबिंदू मनुष्य हाच असला पाहिजे. (मनुष्याला) निसर्गसह आरोग्यपूर्ण आणि उत्पादक (म्हणजे संपन्न) जीवनाचा अधिकार आहे.' (सं. बिझिनेस लाइन, ६ ऑगस्ट २००४) या भूमिकेमध्ये बदल झाला असण्याची शक्यता नाही. निवड कठीण आहे. परंतु गत्यंतर नाही. पर्यावरण महत्वाचेच परंतु विकास अधिक महत्वाचा असे मला वाटते. नवीन सरकार ते करील ही आशा! लेखन अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक असून आर्थिक घडामोडींचे आहेत

Teacher's Signature

Page No.
Date

★ लोकसंख्या वाढीचे परिणाम

1. अन्नधान्याचा तुटवडा - कुटुंबामध्ये जास्त माणसे वाढली तर सर्वांना नीट आहार देणे अशक्य होते. कारण त्यावर खर्च जास्त होतो. उत्पन्न कमी व त्यामुळे महागाई वाढते. दुष्काळ पडला तर अन्नधान्य महाग होते व त्याचा पुरवठा करणे शासनाला देखील कठीण जाते. त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्याची टंचाई, शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याची टंचाई तसेच पाणी अनेक कारणांसाठी वापरावे लागते. त्यामध्ये जर दुष्काळ पडला तर पाणी मिळत नाही. त्यामुळे शेतीला पाणी देता येत नाही व अन्न धान्य मोठ्या प्रमाणावर म्हणजेच लोकसंख्येच्या प्रमाणात पिकवीता येत नाही त्यामुळे महागाई वाढते व कुटुंबाला पुरेसा आहार मिळणे कठीण होते व यामधूनच कुपोषणाचे प्रमाण वाढते व अनेक रोग आजारांना सामोरे जावे लागते.

2. अपुरा निवारा - पूर्वी जर कुटुंबात ठराविक माणसे राहत असतील तर त्यांना ते घर राहण्यास पुरते. परंतु त्याच कुटुंबात अनेक सदस्य वाढले तर ते घर अपुरे पडते व दुसरे बांधावे लागते. जरी जास्त घरे बांधली तरी जमीन वाढत नाही. त्याचा परिणाम अन्न-धान्य पिकविण्यावर होते.

3. दळणवळण, शैक्षणिक, आरोग्य सुविधा यांचा अभाव - लोकसंख्या वाढल्यामुळे प्रवासाच्या ज्या सुविधा आहेत. त्या अपुऱ्या पडतात. तसेच अपघातांचे प्रमाण वाढते. त्याचबरोबर शाळा कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नाही. त्यामुळे गरीब मुलांना शिक्षण घेणे अवघड होते. वरील अडचणी बरोबर शासनाला आरोग्य सुविधा पुरविणे अवघड होते.

4. साधनसंपत्ती व ऊर्जेची कमतरता आहे.

Teacher's Signature


दुनिया - 787 करोड़ 74 लाख
भारत - 139 करोड़ 40 लाख
World Population Day
दुनिया भर में सर्वाधिक जनसंख्या वाला देश बनकर..
हम फिर लौटेंगे शीर्ष से..

५. जंगलतोड - जळणासाठी लाकूड, घरबांधणी / फर्निचर यासाठी माणसाने जंगलतोड केली. लोकसंख्या वाढीचा परिणाम निसर्गावर झाल्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडते. तसेच उद्योगासाठी जागा उपलब्ध करण्यासाठी सुद्धा जंगलतोड झाली. याचा परिणाम पाऊस वेळेत न पडण्यावर झाला

६. स्थलांतर - नोकरी व्यवसायाच्या शोधार्थ होणाऱ्या स्थलांतरामुळे शहरांची अपाट्याने वाढ होते व शहराच्या सर्व यंत्रणांवर ताण पडू लागतो कारखान्याच्या धुराने, सांडपाणी नदीमध्ये सोडल्याने पाणी दूषित होते. वाहनामुळे हवा प्रदूषण होते.

७. गुन्हेगारीचे वाढते प्रमाण - शिक्षण जरी मिळाले तरी नोकरी मिळत नाही व गरिबी असल्यामुळे जीवन अवस्थित जगता येत नाही. त्यामुळे गुन्हेगारी व अत्याचाराचे प्रमाण वाढते.

वरील सर्व कारणांमुळे आपल्याला स्वस्थ व सुरक्षित जीवन जगता येत नाही. ह्या समस्यांची तीव्रता कमी करायची असेल तर त्यावरचे उपाय आपण लगेचच माझी आपल्या कुटुंबापासून सुरू केले पाहिजेत.

स्रोत: लोकसंख्या शिक्षण, माहिती व शिक्षण मार्गदर्शक पुस्तिका, ~~बॉट~~

Teacher's Signature

Page No.
Date

लोकसंख्या वाढ : कारणे, दुष्परिणाम व उपाय

lokSankhya / Population information :

2011 च्या जनगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या 125 कोटी आहे. ही लोकसंख्या जगाच्या एकूण लोकसंख्या 17.5% आहे. आपला देश भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश चीन (134.1 कोटी) नंतर दुसरा देश आहे. भारताची एकूण लोकसंख्या अमेरिका, जपान, इंडोनेशिया, ब्राझील पाकिस्तान या सर्व देशांच्या एकूण लोकसंख्या एवढी आहे व ही लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

1951 साली भारतीय लोकसंख्या 36.86 कोटी होती. आणि 2011 येईपर्यंत ही लोकसंख्या 121 कोटी झाली. आजची हालत अशी आहे की जगातील सहा व्यक्ती मधुन एक व्यक्ती भारतीय आहे. भारतात होत असलेल्या जनसंख्या विस्फोटावर जर आळा घातला नाही तर तज्ञांच्या मते 2030 पर्यंत भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनून जाईल.

लोकसंख्या म्हणजे काय ?

कोणत्याही देशातील शहर, जिल्हे, तालुके आणि खेड्या भागात राहणाऱ्या लोकसंख्या एकूण संख्येला देशाची लोकसंख्या म्हटले जाते. गरजेपेक्षा जास्त लोकसंख्या वाढल्याने देश व संपूर्ण जगाला याचे दुष्परिणाम भोगावे लागतात. पुढे आम्ही lokSankhya vadhiche Parinam आणी लोकसंख्या कमी करण्यासाठीचे काही उपाय सांगितले आहेत.

Page No.
Date

लोकसंख्या वाढ म्हणजे काय आहे ? (loksankhya vadh)

कोणत्याही देशातील, शहर आणि क्षेत्रातील लोकांची संख्या वाढणे म्हणजेच लोकसंख्येची वाढ होय. लोकसंख्यावाढ ही भारतासह जगभरा समोरील मोठी समस्या आहे.

लोकसंख्यावाढिची व्याख्या सोप्या शब्दात सांगायची झाली तर जेव्हा देशातील मृत्यु दरात कमी येते व जन्मदर वाढतो तेव्हा मोठ्या प्रमाणात लोकसंख्येत वृद्धि होते या स्थितीला 'लोकसंख्या विस्फोट' देखील म्हटले जाते.

लोकसंख्या वाढीची कारणे (loksankhya vadhiche Karan)

१) 1951 ते 1961 ह्या काळात भारतातील सरासरी वार्षिक जन्मदर 42 / हजार होता. सन 2011 मध्ये हा जन्म दर कमी होऊन 24.8 / हजार झाला, याच पध्दतीने 1951 ते 1961 ह्या काळात मृत्यु दर हा 27 / हजार होता. जो सन 2011 मध्ये कमी होऊन 8 / हजार वर झाला या मध्ये जन्म दरात थोडी कमी झाली परंतु मृत्यु दरात मोठ्या प्रमाणात कमी झाली त्यामुळे जन्मदर आणि मृत्युदरातील अंतर वाढते. या दोघांमधील वाढते अंतर वाढत्या लोकसंख्ये मागील महिले कारण आहे.

२) वाढते विज्ञान व चिकित्सा क्षेत्रातील प्रगतीमुळे अनेक रोगांवरील दवा व्यापक प्रमाणात उपलब्ध झाल्या आहेत. ह्या औषधींच्या उपयोगामुळे शिशु मृत्यु दरात खुप मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. तसे पाहता हे एक सकारात्मक पाऊल आहे. परंतु [illegible] क्षेत्रातील या [illegible] मागील

काही दशकांमध्ये देशाची लोकसंख्या वाढली आहे.

3) देशातील वाढत्या लोकसंख्या मागील आणखी एक कारण निरक्षरता होय. आपल्या देशात मोठ्या प्रमाणात लोकसंख्या अशिक्षित आहे. कुटुंबनियोजनाचे योग्य ज्ञान नसल्याने हे लोक २ पेक्षा जास्त अपत्य जन्माला घालतात. व यामुळे देशातील लोकसंख्या वाढते.

4) देशातील काही धार्मिक रूढीवादी लोक कुटुंबनियोजनाचे नियम अवलंबण्यास विरोध करतात. ज्यामुळे त्यांची लोकसंख्या वाढते.

5) वाढत्या लोकसंख्येमागील आणखी एक कारण देशातील गरिबी होय. अनेक गरीब आई वडील फक्त मुलगा मुलगी जन्माला घालतात कारण त्यांना आर्थिक मदत हवी असते. या मुलांना कमी वयात बाल मजुरी व इतर श्रमाच्या कामांवर लावून दिले जाते.

SEAL

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce Colley
Sitabuldi Nagpur-15